Radhabai Kale Mahila Mahavidyalaya, Ahmednagar-414001

# समकालीन आदिवासी कविता

डॉ. तुकारान रोंगटे

प्रा. चिंतामण धिंदळे.

साधारणतः १९९० पासून जागतिकीकरण भारतात आले. दूरसंचार क्षेत्रातून ते शेती, उद्योग, व्यवसाय, सेवा अशा सर्व क्षेत्रात जागतिकीकरणाने आपला शिरकाव केल्याचे दिसते. हे जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण नानव जातोच्या विकासाचे मूळ कारण आहे असा समज साधारणतः २००० सालापर्यंत लोकांचा होता. या जागतिकीकरणातील घटक म्हणजे 'संगणक' क्रांती संगणक क्रांतीने प्रथम माणसांचे काम हलके करण्याचा प्रयत्न केला. हळूहळू माणसाऐवजी यंत्र संस्कृतीने आपला पाय खोलात रोवला. आणि माणसाऐवजी यंत्रे काम करू लागली. प्रथम १० माणसाऐवजी एक यंत्र पुढे पुढे दहा हजार माणसे एक यंत्र त्याहीपुढे एक लाख, एक कोटी आणि आता एक अब्ज एक यंत्र अशी स्थितो झाली. पर्यायाने संपूर्ण जगात यंत्र संस्कृतीने धुमाकूळ घातला. आणि बेरोजगारी नावाची संकल्पना चर्चेसाठी आली. या सर्वांचा परिणाम म्हणून साहित्यातही खूप बदल झाल्याचे दिसू लागले. दलित, स्त्रीवादी,. ग्रामीण आणि महानगरीय साहित्य प्रवाह बरोबरच आदिवासी साहित्यातही जागतिकीकरणाचे पडसाद उमटू लागले. आदिवासी साहित्यात प्रामुख्याने माणूस आणि निसर्ग अशा प्रेरणा मूलभूत मानल्या गेल्या आहेत.

१९६० ते ७० पर्यंतच्या आदिवासी साहित्यात निसर्ग, संस्कृती माणूस यांच्या भोवती फिरणारे आदिवासी साहित्य, १९८०–९० च्या दशकात ते जागतिकीकरणाने आदिवासींवर होणाÚया विपरोत परिणामांचे आणि पडसादाचे साहित्य म्हणून उदयास येऊ लागले. आदिवासी साहित्यात माणूस आणि निसर्ग या प्रेरणा आजही कायम असून माणूस आणि निसर्ग यावर झालेल्या परिणामा विषयी लेखन सुरू झाले. १९२० ते २००० पर्यंत जागतिकीकरणाच्या रेट्यात आदिवासींवर होणारे अत्याचार, अन्याय याविषयीचा लढा उभा करणारे साहित्य लिहिले गेले. २००० ते २०१९ पर्यंत या साहित्याचे परिणाम बदलून जागतिकीकरणाला विरोध त्याचे चांगले,वाईट परिणाम यावर मोठ्या प्रमाणात लेखन यायला लागले. या साहित्यात प्रामुख्याने 'कविता' या साहित्य प्रकाराचे योगदान फार मोठे आहे. समकालीन आदिवासी कवितेतील प्रतिमा, रूपके, मिथके, आणि एकूणच विषय आशयाच्या अंगाने विचार करता आपणास बदललेल्या संकल्पना विषयी चर्चा करता येईल. २००९ ते २०१९ या कालखंडात जवळजवळ ५५ ते ६० आदिवासी कवितासंग्रह संग्रह मराठीत आले आहेत. समकालीन आदिवासी कविता या विषयाच्या अनुषंगाने निवडक एका कवितासंग्रहाच्या विचार या ठिकाणी करावयाचा आहे. 'झडप' कवी देवदत्त चौधरी या कवीच्या कवितांच्या अनुषंगाने समकालीन आदिवासी कविता नेमकी कशी आहे, बदलत्या काळाच्या घडामोडी व बदलाविषयी ती कविता काय भाष्य करते याची चिकित्सा आपणास करता येईल. आदिवासी कवितेतील एक प्रातिनिधिक स्वरूपाच्या कवीचा अभ्यास या ठिकाणी समकालीन आदिवासी कविता समजून घेण्यास पुरेसे आहे असे मला वाटते.

'झडप'या देवदत्त चौधरी यांच्या कविता संग्रहातून एकूण ६९ कविता आहेत. 'बाप' या कवितेपासून ते '७२' च्या दुष्काळात पर्यंतचा संबंध आपणास पाहता येईल. समकालीन कवितेत बदललेले संदर्भ शोधताना आपणास साधारणतः साहित्य प्रवाहाच्या निर्मिती कालखंडापासून ते आतापर्यंत बदललेल्या सामाजिक सांस्कृतिक राजकीय संकल्पनांचा आढावा घ्यावा लागतो. समकालीन कळतील बदललेले संदर्भ तपासताना बदललेल्या संदर्भाच्या मुळाशी जावे लागते. 'बाप' या कवितेचा अभ्यास करताना आपणास बाप ही संज्ञा सर्वकालीन एकसमान अशीच असावी लागते. बाप मग तो गरीब असो, श्रीमंत असो, भिकारी असो बाप तो बापच असतो. आपल्या मुलांशी पत्नीशी त्याचे संबंध बदलायला नकोत; परंतु बदललेल्या सामाजिक संरचनेत खरंच बाप बदललेला आहे का? आणि त्याच्या बदलाचं अभ्यास करावा लागतो बदललेल्या त्याच्या एकूण वर्तनाचा स्वभावाचा आणि सामाजिक स्थितीचा बारकाव्याने आढावा घ्यावा लागतो, बाप या कवितेत देवदत्त चौधरी काय म्हणतात ते बघू या –

'नेहमीच माझा बाप मला
मोठ सपन दावायचा



Vidyawarta Peer Review Research Journal
ISSN 2319 9318, Impact Factor: 6.021